**ठळक बातम्या**

- आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या भत्त्यांमधे वाढ करण्याचा राज्य शासनाचा निर्णय
- अंदाज समित्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेचा समारोप
- राज्य शासनाचे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**आणि**

- भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं निधन

<><><><><>

राज्य सरकारनं आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता तसंच आहार भत्त्यात वाढ करायचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. राज्यातल्या १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गालाही आजच्या बैठकीत मान्यता दिली गेली. हा प्रकल्प महामंडळामार्फत राबवला जाणार असून, प्रकल्प आखणी आणि भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीला या बैठकीत मान्यता मिळाली.

२०१७च्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमात सुधारणा करून, आगामी अधिवेशनात नवं विधेयक आणण्याचा निर्णयदेखील आजच्या बैठकीत झाला.

<><><><><>

केंद्र आणि राज्य सरकारकडून कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च वाढत असल्याने संसद आणि विधिमंडळाच्या अंदाज समित्यांची जबाबदारी वाढली असून या समित्यांनी अधिक कार्यक्षमतेने जबाबदारीचं पालन करावं असं आवाहन

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात केलं. अंदाज समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. देशावरील कर्जाचा भार पाहता जन कल्याणासाठी अधिक खबरदारीने खर्च करण्याची गरज आहे. त्यात या समित्यांची भूमिका महत्वाची असल्याचे ते म्हणाले.

संसदीय समित्या सरकारच्या विरोधी नव्हे तर पूरक काम करतात. त्यांच्या अहवालाकडे पाहताना सरकारने हाच दृष्टिकोन ठेवावा आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या समित्यांचे अहवाल योग्यरितीने अंमलात आणावे अशी सूचना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी केली.

**Hold - Byte**

संसदीय समित्यांनी योग्य रीतीने समीक्षा केली तर अनेक बदल घडू शकतील. आतापर्यंत अनेक बदल झाले असले तरी बदलांना खूप वाव आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आणि तंत्रज्ञान तसंच data analysis चा वापर करून अधिक चांगलं काम करता येईल, असही ओम बिर्ला म्हणाले.

सुशासनासाठी विचारपूर्वक खर्चाची गरज असते यावर परिषदेत चर्चा झाल्याचं राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. संसदेच्या अंदाज समितीचे अध्यक्ष संजय जयस्वाल यांनी या परिषदेत झालेल्या कामकाजाचा आढावा घेतला. विधान परिषद सभापती राम शिंदे, विधान सभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

संविधान हत्या दिवस उद्या पाळण्यात येणार आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. या १८ महिन्यांच्या  काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या

सर्वांना त्यानिमित्त आदरांजली वाहण्यात येईल. या निमित्तानं प्रत्येक भारतीयाच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीची ज्योत तेवत राहते, तसंच हुकुमशाही प्रवृत्तींशी लढा देण्याची प्रेरणा मिळत राहावी याकरता हा दिवस गेल्या वर्षीपासून पाळला जातो.

**<><><><><>**

त्रिभाषा सूत्रासंदर्भात साहित्यिक, भाषा तज्ञ, राजकीय नेते आणि इतरही सर्व संबंधितांशी चर्चा करुनच अंतिम निर्णय घेतला जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. याबाबतीत काल रात्री मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी काल रात्री बैठक झाली, त्या बैठकीत ते बोलत होते. यासंदर्भात मराठी भाषा अभ्यासक, साहित्यिक, राजकीय नेत्यांसह सर्व संबंधितांसमोर सादरीकरण आणि सल्लामसलत करावी असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्यासंह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना युपीएस अर्थात एकीकृत निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय निवडण्यासाठी आणखी तीन महिन्यांचा अवधी दिला आहे. एनपीएस किंवा युपीएस पैकी कोणती निवृत्ती वेतन योजना निवडायची हे आता येत्या ३० सप्टेंबर पर्यंत कळवता येईल.

**<><><><><>**

पत्रकारितेच्या क्षेत्रातल्या उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्या वतीने दिले जाणारे २०२१ ते २०२३ या तीन वर्षांसाठीचे पुरस्कार जाहीर झाले आहे. यामध्ये पाच ज्येष्ठ पत्रकारांना लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. राही भिडे, सुधीर पाठक, भाऊ तोरसेकर, विजय बाविस्कर आणि बाळासाहेब जाधव या पाच पत्रकारांना हे यंदाचे मानकरी आहेत. एक लाख रुपये,

मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. सन २०२१ सालचा अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार मंगेश वैशंपायन यांना मिळाला आहे. १ लाख रुपये, मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

याखेरीज इतर विविध प्रकारांमधे दिले जाणारे पुरस्कारही जाहीर झाले असून ५१ हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नाशिक इथे सुरू असलेल्या राज्य अधिवेशनात काल डॉक्टर भालचंद्र कानगो यांना स्वातंत्र्यसैनिक कॉम्रेड माधवराव गायकवाड जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह असं पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

इराण बरोबरच्या युद्धबंदीला अखेर इस्त्रायलने सहमती दिली आहे.  इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमामुळे निर्माण झालेल्या धोक्याला आळा घालण्याचं उद्दिष्ट साध्य झालं असून भविष्यात या युद्धबंदीच्या कराराचं उल्लंघन झाल्यास इस्त्रायल ते सहन करणार नाही, असं इस्त्रायल सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू लवकरच युद्धबंदीबाबत आपलं अधिकृत निवेदन जारी करतील, असंही या निवेदनात म्हटलं आहे. गेले १२ दिवस सुरू असलेल्या या युद्धामुळे इराणमध्ये २२ जूनपर्यंत ८६५ जण मृत्युमुखी पडले. तर ३ हजार ३००हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती मानवाधिकार वृत्तसंस्थेने दिली आहे. इस्त्रायलमध्ये २४ नागरिकांचा मृत्यू झाला असून ६०० हून अधिक जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं ऑपरेशन सिंधू अंतर्गत आत्तापर्यंत इराणमधून २ हजार २९५ भारतीय नागरिकांना मायदेशी सुखरुप परत आणलं आहे, इस्रायलमधूनही १६५ भारतीय नागरिक मायदेशी परतले.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन - तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं इंग्लंडसमोर विजयासाठी ३७१ धावांचं आव्हान ठेवलं आहे. दुसऱ्या डावात भारताने ३६४ धावा केल्या असून उपकर्णधार ऋषभ पंतने ११८ धावा फटकावल्या. दोन्ही डावात शतक झळकवणारा तो पहिला भारतीय यष्टिरक्षक फलंदाज ठरला आहे. के एल राहुलनेदेखील १३७ धावा केल्या. तर शेवटचे तीन फलंदाज शून्यावर बाद झाले. काल दिवसअखेर इंग्लंडने एकही गडी न गमावता २१ धावा केल्या. सामन्याचा आज अखेरचा दिवस आहे.

<><><><><>

भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं सोमवारी रात्री लंडन इथे हृदयविकारामुळे निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि यशस्वी हिंदी क्रिकेट समालोचक म्हणून ते लोकप्रिय होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आठशे अठ्ठ्याण्णव बळी घेणाऱ्या दिलीप दोशी यांनी २३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४३ वेळा ५ बळी घेतले. एका सामन्यात दहा बळी घेण्याचा विक्रम त्यांनी सहा वेळा केला होता. दोशी यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये तसंच परदेशी कौंटी क्रिकेटमध्येही आपलं कौशल्य दाखवलं होतं. भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं दोशी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

राज्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाच्या जोरदार सरी येत आहेत. राजधानी मुंबईत आकाश काळ्या ढगांनी दाटून आलं आहे, सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाच्या तुरळक सरी येत आहेत. **रत्नागिरी** जिल्ह्यात जगबुडी नदीने पुन्हा एकदा इशारा पतळी ओलांडली आहे. **सातारा** जिल्ह्यात कण्हेर आणि उरमोडी धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरु असून दुपारपासून पाण्याचा विसर्ग वाढवला आहे.

**नाशिकमधे** पाऊस ओसरल्यानं गंगापूर धरणातला विसर्ग कमी केला आहे. दारणा धरणातून होणारा विसर्ग वाढवून ४ हजार १७२ क्युमेक इतका केला आहे.

**<><><><><>**

पुढचे दोन दिवस पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि नंदूरबार जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता असून हवामान विभागानं या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तसंच नाशिक आणि पुणे घाटमाथ्यावर अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे. तर कोल्हापूर आणि सातारा घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**